अस्सल सोलापुरी
सुराज्य सोलापूर

## अल्पवयीन मुलीची छेडछाड; आरोपीची निर्दोष मुक्तता

✔ **बार्शी :** चिखर्डे (ता. बार्शी) येथील अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याच्या प्रकरणी आरोपावरून पोक्सो गुन्ह्यातील आरोपी काका सुभाष धस याची येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री.व्ही.के.मांडे साहेब यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली आहे.

आरोपी धस हा चिखर्डे येथील रहिवाशी आहे. त्याने १३ जून २०२० रोजी गावातच राहणाऱ्या अल्पवयीन मुलगी घरी एकटीच असताना तिला हाताने इशारे करून तिच्या मनास लज्जा वाटेल होईल असे कृत्य केले. याची फिर्याद अल्पवयीन मुलीच्या आईने सोलापूर ग्रामीण पोलीस ठाणे पांगरी येथे दाखल केली होती. त्याप्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. हा खटला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.के.मांडे साहेब यांच्या समोर चालविण्यात आला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीची या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे ॲड. महेश जगताप, ॲड. राहुल कसबे, ॲड. दैवशाला जाधवर,ॲड. केदार पाटील, ॲड. आदित्य काकडे यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड. प्रदीप बोचरे यांनी काम पाहिले.



# राजधानी दिल्लीत लवकरच राजकीय भूकंप

## शेकापच्या अधिवेशनात पवारांचा हवाला देत पाटलांनी केला गौप्यस्फोट

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

**राजधानी नवी दिल्लीमध्ये लवकरच राजकीय भूकंप होण्याचे भाकित वर्तवण्यात आल्याने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. पंढरपूरमध्ये शुक्रवारी सुरू झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनात या पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा हवाला देवून राजकीय उलथापालथ होण्याचा गौप्यस्फोट केला.**

पंढरपूरमध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय अधिवेशनाला सुरूवात झाली.या अधिवेशनाचे उद्घाटन शरद पवार यांच्या हस्ते होणार होते परंतु ते आले नाही.त्यामुळे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनाच्या भाषणात बोलताना पाटील यांनी पवार का आले नाहीत,याविषयीचे स्पष्टीकरण दिले. दिल्लीमध्ये या महिन्यामध्ये मोठी राजकीय उलथापालथ होत असून त्यामुळे मी येऊ शकत नाही, असा फोन शरद पवार यांनी आपल्याला केल्याचे पाटील यांनी सांगितले.तेव्हा अधिवेशनातील वातावरण एकदम स्तब्ध झाले.सांगत शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी मोठा गौप्यस्फोट केला.

दोन दिवसापूर्वी शरद पवार यांनी फोन करून दिल्लीत मोठी राजकीय घडामोड सुरु असून या महिन्यात ती होणार असल्याने आपण कार्यक्रमास येऊ शकत नसल्याचे पवार यांनी सांगितल्याचा हवाला भाई पाटील यांनी दिला. या अधिवेशनास माकपचे दीपंकर भट्टाचार्य यांच्यासह शेकापचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

### सरकार पाडा, स्वागत करू

आपण दिल्लीतील सरकार पाडा मग या , आम्ही तुमचे स्वागत करू अशा शुभेच्छा आपण पवारांना दिल्याचेही भाई पाटील यांनी सांगितले.

### अनेक प्रकरणांची किनार...

पवार यांच्या भाकिताला अनेक प्रकरणांची किनार असावी,अशी चर्चा होते आहे.मोदी सरकार तिसऱ्यांदा स्थानापन्न झाले.भाजपला बहुमत नाही पण एनडीएतील घटक पक्षांमुळे भाजपचे सरकार येवू शकले. सुरूवातीपासूनच मोदी सरकारच्या स्थिरतेवर शंका उपस्थित झाल्या होत्या.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हे केव्हाही एनडीएमधून बाहेर पडतील,असे सूतोवाच त्यावेळी केले गेले होते.बिहार राज्याला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा नितीश यांचा प्रस्ताव भाजपने फेटाळला होता.त्यामुळे नितीश हे नाराज असल्याचे सांगण्यात येते.त्यातच कॉंग्रेसने मोदींवर हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याची तयारी केली आहे.या दोन प्रकरणांची किनार पवारांच्या अंदाजाला असावी,असे सांगण्यात येते.

### कुमारस्वामी देखील नाराज

दुसरीकडे एनडीएतील घटक असलेल्या कर्नाटकातील जेडीएसनेही भाजपपासून काही अंतर ठेवले आहे. कर्नाटकात एनडीएकडून आजपासून तिथल्या सिद्धरमैय्या सरकारविरोधात पदयात्रा काढण्यात येणार आहे. मात्र, भाजपच्या या पदयात्रेत आमचा पक्ष सहभागी होणार नाही अशी घोषणा जेडीएस प्रमुख कुमारस्वामी यांनी केली आहे. जेडीएसच्या या पवित्र्यामुळे ते भाजपासोबत नाराज आहेत का अशी चर्चा सुरू झाली आहे. त्यातच पवारांनी हे विधान केल्यामुळे देशाच्या राजकारणात पुढील १ महिन्यात काही महत्वाची घडामोड घडणार का याकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागून आहे.



### भाजप सरकार जाणार

केंद्रातील भाजप सरकार चार महिन्यातच बदलणार आहे. त्यानंतर दिल्ली सरकारमध्ये पृथ्वीराज चव्हाण जातील असे वक्तव्य देखील पाटील यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. केंद्रातील सरकार चार महिन्यात बदलणार आहे. दिल्लीतील नव्या सरकारमध्ये पृथ्वीराज चव्हाण जातील. चव्हाण यांनी त्याांचे अनेक वर्षाचा कार्यकाळ दिल्लीत घालवला आहे. त्यामुळे त्याचा फायदा आम्हाला महाराष्ट्राला होईल असेही पाटील त्यावेळी म्हणाले होते.

## नोकराने केली सोन्याच्या दुकानात चोरी

### जोडभावी पेठ डी.बी. पथकाकडून गुन्हा उघडकीस

**तीन लाख ८४ हजारांचा मुद्देमाल हस्तगत**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील पूर्व मंगळवार पेठेतील सोन्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या नोकराला जोडभावी पेठेच्या डी.बी.पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून तीन लाख ८४ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

सुप्रिया संगमेश्वर (वय ३५, रा. भवानी पेठ सिध्देश्वर हौसिंग सोसायटी सोलापूर) यांचे गुरुमहाराज संगमेश्वर ज्वेलर्स नावाचे पूर्व मंगळवार पेठ सराफ कट्टा येथे सोन्याचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात काम करणारा नोकर विजय बालाजी कोंडा (वय-३४, रा-लक्ष्मी नरसिंह झोपडपट्टी) याने दुकानातून सोन्याचे गंठण, नेकलेस, कानातील एअर रिंग असे एकूण ५.३ तोळे सोन्याचे दागिने चोरी केले होते. सुप्रिया संगमेश्वर यांच्या फिर्यादीवरून विजय कोंडा याच्याविरुध्द कलम गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपी कन्ना चौक येथील एका कँटीनवर चोरीचे सोने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती जोडभावी पेठेच्या डी. बी. पथकाला मिळाली. त्यांनी सापळा रचून विजयला पकडले. त्याच्याकडून तीन लाख ८४ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. ही कामगिरी जोडभावी पेठ पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख, सपोनि/पडसळकर, पोहेकॉ खाजप्पा आरेनवरु, शितल शिवशरण, विठ्ठल पैकेकरी, बसवराज स्वामी, स्वप्नील कसगावडे, दादासाहेब सरवदे, निलेश घोगरे, अभिजीत पवार, दत्ता काटे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी पार पाडली आहे.



**सोलापूर : जोडभावी पेठेच्या डी.बी.पथकाने ताब्यात घेतले तीन लाख ८४ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत करण्यात आले. यावेळी पोलीस पथक.**

## अमोल मिटकरी हा भुरटा; पुन्हा आमच्या नादी लागला तर...

### दिलीप धोत्रे यांचा इशारा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

अमोल मिटकरी हा भुरटा आहे. हा कसला आमदार? लांगून चालन करून, हुजरेगिरी करून त्याने आमदारकी मिळविली आहे. भुरटा माणूस तो, त्याला चोप कमी पडला आहे. त्या दिवशी तो पळून गेला, लपून बसला. आता तो पुन्हा आमच्या नादी लागला तर काय असते, ते आम्ही त्याला सांगू, असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उपनेते दिलीप धोत्रे यांनी आमदार अमोल मिटकरी यांना दिला.

आमदार मिटकरी यांनी मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर त्यांच्यावर मनसेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला केला होता. त्यावरून मिटकरी आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये जुंपली आहे. त्यात आता सोलापूरच्या नेत्यांनीही मिटकरी यांना इशारा दिला आहे. अमोल मिटकरी हे आतापर्यंत मोठमोठ्या लोकांच्या विरोधात बोलायचे. प्रसिद्धी मिळवायचे.

अजितदादांचं लांगूनचालून करायचं, अशा पद्धतीने त्यांनी काम केले आहे. त्यांना वाटत होतं की, त्यांना कोणी उत्तर देत नाही. त्यामुळे ते मस्तवाल झाले होते. ते ज्यावेळी आमच्या दैवतावर बोलले, त्या वेळी आमच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना चोप दिला आहे. त्यांना चोप कमी पडला आहे, असे धोत्रे म्हणाले.



दिलीप धोत्रे

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आता समजलं, तुम्ही इतक्या पदव्या कशा मिळविल्या!

| कल्याण |
| --- |
| 369-81-146 |

| मुंबई |
| --- |
| 146-12-336 |













